# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.08.2024** **वारःसोमवार**

---

1. कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने घेतली स्वत:हून दखल
2. सरकारची उच्चस्तरीय बैठक देशातील mpox परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी; त्यावर बारकाईनं लक्ष ठेवण्याचे राज्यांना निर्देश
3. भारत आणि कुवेत यांच्यातील भागीदारी सातत्याने वाढ- परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर.
4. नौदल संबंध मजबूत करण्यासाठी आयएनएस तबर डेन्मार्कमध्ये दाखल
5. आज देशभर 'राखी पौर्णिमेच्या'सणाचा उत्साह आणि
6. पश्चिमबंगाल, ईशान्येकडील राज्यांसाठी ऑरेंज अलर्ट; बिहार आणि दक्षिण भारतात मुसळधार पावसाची शक्यता

<u>**सर्वोच्च न्यायालय दखल**</u>

कोलकाता येथील कथित बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयानं स्वतःहून दखल घेतली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठापुढं मंगळवारी म्हणजे उद्या या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. कोलकात्याच्या आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या केल्याचा आरोप आहे. या घटनेच्या दुसऱ्या दिवशीच कोलकाता पोलिसांनी याप्रकरणी एका नागरी स्वयंसेवकाला अटक केली होती. या घटनेच्या निषेधार्ध संपूर्ण देशभरात निदर्शनं करण्यात येत असून या प्रकरणात सहभागी असलेल्यांविरुद्ध कारवाईची मागणी देशातील डॉक्टरवर्गाकडून करण्यात येत आहे. पीडित डॉक्टरचे पालक आणि काही व्यक्तींनी दाखल केलेल्या याचिकांची दखल घेत या प्रकरणाची केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीबीआय मार्फत चौकशी करण्याचे आदेश कोलकाता उच्च न्यायालयानं 13 ऑगस्टला दिले होते. त्यानंतर आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयात आंदोलन सुरू असताना तिथे झालेल्या नासधूशी बद्दल न्यायालयानं नुकतंच पश्चिम बंगाल प्रशासनालाही या प्रकरणात ओढलं आहे.

<u>**डॉक्टर्स**</u>

दरम्यान कोलकाता येथील या प्रकरणाच्या निषेधार्थ राजधानी दिल्लीत निवासी डॉक्टर्स आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचं आंदोलन कालही सुरू होतं. निवासी डॉक्टरांच्या संघटनेच्या वतीनं काल संध्याकाळी दिल्लीतील राजीव चौक मेट्रो स्थानकानजीकच्या परिसरात मेणबत्ती मोर्चा काढण्यात आला. या दुःखद घटनेबद्दल जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशानं मानवी साखळी तयार करून मेणबत्त्या प्रज्वलित करण्यात आल्या. याप्रकरणी न्याय मिळावा अशी मागणी त्यांच्यावतीनं करण्यात आली.

<u>**एम पॉक्स**</u>

पंतप्रधानांचे प्रधान सचिव डॉक्टर पी के मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत एमपॉक्स या रोगाच्या साथीला तोंड देण्याच्यादृष्टीनं देशभरातील सज्जतेच्या सद्य स्थितीचा आणि त्या अनुषंगानं सार्वजनिक आरोग्यासाठी आखण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. पंतप्रधान मोदी देशातील एमपॉक्सच्या परिस्थितीवर सातत्यानं लक्ष ठेवून असल्याचं मिश्रा यांनी सांगितलं. एमपॉक्सच्या प्रकरणांचं तातडीनं निदान केलं जावं आणि त्यावर अधिक बारकाईनं लक्ष

ठेवण्यात यावं असे निर्देश मिश्रा यांनी यावेळी राज्यांना दिले. त्वरित निदानासाठी चाचणी प्रयोगशाळांनी ताबडतोब पावलं उचलावीत असेही निर्देश त्यांनी दिले. याशिवाय या रोगाच्या प्रतिबंधासाठी पाळायचे नियम आणि त्यावरील उपचारांची माहिती मोठ्या प्रमाणात लोकापर्यंत पोहोचवण्याची प्रभावी उपाययोजना आखाव्यात, तसंच बाधित रुग्णांवर वेळीच उपचार होण्यासाठी, त्याच्या लक्षणांबाबत आरोग्यसेवा पुरवणाऱ्यांमध्ये जागृती निर्माण करावी असंही मिश्रा यांनी बैठकीत सांगितलं. सध्या 32 प्रयोगशाळांमध्ये एमपॉक्सच्या निदानाची सुविधा उपलब्ध आहे.

**<u>भारत-कुवेत</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री, डॉ. एस जयशंकर यांनी काल कुवेतचे युवराज शेख सबाह अल-खालेद अल-सबाह अल-हमद अल-मुबारक अल-सबाह यांची काल भेट घेतली. भारत आणि कुवेत यांच्यात सद्भावना आणि मैत्रीचे अनेक शतकांपासूनचे संबंध असून दोन्ही देशांमधील भागीदारीत सातत्याने वाढ होत आहे, असं डॉक्टर जयशंकर यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. उभय देशांदरम्यानचे हे संबंध आणखी वरच्या पातळीवर नेण्यासाठी युवराजांनी मार्गदर्शन करून सल्ला दिल्याबद्दल जयशंकर यांनी आपल्या संदेशात त्यांचे आभारही मानले आहेत. जयशंकर यांनी कुवेतचे पंतप्रधान शेख अहमद अब्दुल्ला अल अहमद अल जबेर अल सबाह यांचीही भेट घेतली. यावेळी त्यांनी उभय देशांमधील संबंध तसंच आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी मांडलेल्या मौलिक दृष्टिकोनाची डॉक्टर जयशंकर यांनी प्रशंसा केली.

**<u>राजनाथ सिंह</u>**

भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक राकेश पाल यांचं काल चेन्नई इथं निधन झालं. त्यांच्या निधनाबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दुःख व्यक्त केलं आहे. पाल हे समर्थ आणि कामाशी बांधिलकी असलेले अधिकारी होते, त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय तटरक्षक दलानं भारताच्या सागरी सीमांची सुरक्षा बळकट करण्यात मोठा पल्ला गाठल्याचं राजनाथ सिंह यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

**<u>ब्लिंकन</u>**

इस्रायल आणि हमास या पॅलेस्टिनी दहशतवादी गटात सुरू असलेला हिंसाचार संपुष्टात आणण्याच्या अनुषंगानं या आठवड्यात गाझामध्ये युद्धविराम होण्याकरिता राजनयिक दबाव वाढावा, या उद्देशानं अमेरिकेचे परराष्ट्र सचिव अँटनी ब्लिंकन पश्चिम आशियाच्या दौऱ्यावर असून त्यासाठी काल तेल अवीव इथं दाखल झाले. आज ते पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यासह इतर इस्रायली नेत्याची भेट घेणार आहेत, असं अमेरिकी प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानं सांगितलं. ऑक्टोबरमध्ये इस्रायल-गाझा संघर्ष सुरू झाल्यापासून ब्लिंकन या भागाला 10 व्यांदा भेट देत आहेत. इस्रायलनंतर ते इजिप्तला भेट देणार आहेत. दरम्यान काल रविवारी गाझावर झालेल्या हवाई हल्ल्यात सहा मुलांसह 21 जम ठार झाल्याचं पॅलेस्टाईनच्या आरोग्यसेवेतील सूत्रांनी सांगितलं.

**<u>सौरग्राम</u>**

महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी गावामध्ये महावितरणनं विजेची सर्व गरज सौरऊर्जेच्या माध्यमातून भागवली आहे. राज्यातलं पहिलं ‘सौरग्राम’ ठरलेल्या मान्याची वाडीचं लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल करण्यात आलं. राज्यात नवीकरणीय ऊर्जेच्या वापरास प्रोत्साहन देऊन पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व कमी करण्यास राज्य सरकार कटिबद्ध असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं. मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना आणि मागेल त्यांना सौर कृषिपंप, या योजनेतून दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती वीजग्राहकांचं वीजबिल देखील शून्यवत होत आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी आणि घरगुती वीजग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. तर पुढील दीड वर्षात महाराष्ट्रात 12 हजार मेगावॅट सौर उर्जा निर्मिती केली जाणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितलं. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीनं राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यातल्या किमान दोन गावांना 100% सौर ऊर्जेचा पुरवठा करण्याची महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे.

**<u>सागरी प्रदूषण</u>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते काल चेन्नईतल्या भारतीय तटरक्षक दलाच्या प्रादेशिक मुख्यालयातील प्रादेशिक सागरी प्रदूषण प्रतिसाद केंद्राचं उद्घाटन करण्यात आलं. प्रादेशिक सागरी प्रतिसाद केंद्र तेल गळतीच्या प्रतिसादासाठी एकात्मिक दृष्टीकोन सुनिश्चित करून या भागातील देशांमध्ये समन्वय सुलभ करेल. यामुळे तेल गळतीला अधिक एकजुटीने प्रभावी प्रतिसाद देता येऊ शकेल तसंच त्यासाठीची खास उपकरणं आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होण्यास मदत होण्यासोबतच त्यावर प्रत्येक देशाला वैयक्तिकरीत्या शक्य नसलेले नावीन्यपूर्ण तांत्रिक उपाय देखील काढता येऊ शकतील. या अनुषंगानं ASEAN देशांतील 20 परदेशी कर्मचाऱ्यांचं पहिल्या आणि दुसऱ्या पातळीवरचं प्रशिक्षण आजपासून दोन आठवड्यांच्या कालावधीसाठी आयोजित करण्यात आलं आहे.

**<u>तबर</u>**

भारतीय नौदलाची INS तबर ही प्रमुख युद्धनौका दोन दिवसांच्या भेटीसाठी डेन्मार्कच्या एस्जबर्ग येथे दाखल झाली आहे. भारत आणि डेन्मार्क यांच्या नौदलांदरम्यान असलेले संबंध अधिक वृद्धिंगत करणं हा आयएनएस तबरच्या या भेटीचा उद्देश असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. INS तबर बंदरात असताना या नौकेवरील कर्मचारी डेन्मार्कच्या सैन्य दलासोबत आयोजित करण्यात आलेल्या विविध द्विपक्षीय व्यावसायिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहे, यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचाही समावेश आहे.

**<u>राखी पौर्णिमा</u>**

भाऊ बहीण यांच्यातला अनोखा भावबंध अधोरेखित करणारा राखीपौर्णिमेचा सण देशभर आज साजरा होत आहे. यादिवशी बहिणी आपल्या भावांच्या समृद्धी, आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना करत त्यांना राखी बांधतात आणि भाऊ या बहिणींचं रक्षण करण्याचं अभिवचन देतात.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राखीपौर्णिमेच्या सणानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. ‘राखी पौर्णिमा हा भाऊ आणि बहिणींमधील अनोख्या भावबंधाचा सण प्रेम आणि परस्पर विश्वासाच्या भावनांना बळ देतो. हा सण धार्मिक आणि सांस्कृतिक सीमांच्या पलीकडे जाणारा देशातील विविधतेतील एकतेचं प्रतीक आहे. तो महिलांच्या हक्कांचं संरक्षण करण्याचा आपला निर्धार दृढ करतो,’ असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं आज आणि उद्या पश्चिम बंगाल, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरासाठी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. बिहार, छत्तीसगड आणि दक्षिण द्वीपकल्प परिसरातही मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागातील शास्त्रज्ञ डॉ. नरेशकुमार यांनी नवी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधताना सांगितलं.

## याबरोबर आकाशवाणी पुणे केंद्रावरील राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.